RM-1A N.C.R.B.

I.I.F.-1

(65)

# पहिली खबर
## First Information Report

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C )

राज्य State महाराष्ट्र जिल्हा District नाशिक पोलीस ठाणे Police Station सरकारवाडा पहिली खबर क्र. FIR No. 445/2023 वर्ष Year 2023 दिनांक Date 09/11/2023

(i) अधिनियम Act ........ कलमे Sections ........

(ii) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रति. अधिनियम 1988 कलमे Sections 7, 7(अ).

(iii) इतर अधिनियम व कलमे Others Acts and Section ........

(a) अपराधाची घटना : वार Occurrence of Offence : Day दि. 06/09/2023 रोजी तारीख पासून Date from 08.40 ते 09.50 वाजे दरम्यान. वेळ ... तारीख पर्यंत ... वेळ ...

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी P अशी खूण करा. Time applicable portion )

1) 00.00 ते 03.00 2) 03.00 ते 06.00 3) 06.00 ते 09.00 4) 09.00 ते 12.00 5) 12.00 ते 15.00

6) 15.00 ते 18.00 7) 18.00 ते 21.00 8) 21.00 ते 24.00 9) 06.00 ते 18.00 10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date 09/11/2023 वेळ Time 12.20.07

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No 16/2023 तारीख Date 09/11/2023 वेळ Time 13.25

माहितीचा प्रकार Type of Information : ........ लेखी / तोंडी Written / Oral ........

गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of occurence : (a) Direction and distance from P.S. पश्चिमेस 1 कि.मी., दक्षिणेस चौकी/बीट/दुरक्षेत्र नाव व क्रमांक Chouki/ Beat/ O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाण नाव Adress of Occurrence Name मुंबई नाका सर्कल, मुंबई नाका, नाशिक ठिकाणाचे नंबर No. If any गल्ली Ward रस्त्याचे नाव Name of road

जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest identifiable Place : ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, Outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist ........ राज्य State ........

तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complaint/ Informant : Permanent Adress

(a) नाव Name नरेंद्र भास्कर उर्फ राजेंद्र लाठणे. (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husbands Name भास्कर लाठणे

(c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age 53 वर्ष (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं Phone No 9422762865

(e) पारपत्र क्रमांक Passport No ........ दिल्याची दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation शेती व बांधकाम

(g) धर्म Religion हिंदू जात Caste ........ जन जात Sub caste ........

(h) पत्ता : गल्ली/सर्वे नं Address : Ward बंगला नं. घर /नाव नंबर House/Name No विजयनगर कॉलनी, औरंगाबाद नाका फोन/मो. नं Phone/M No ........ पॅन नं Pan No ........ ओटर्स नं Electi No

रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिध्द ठिकाण Nearest Identifiable place पंचवटी गाव Village नाशिक-03 पोस्ट Post ........ पो. स्टे P. Stn. ........

तालुका Taluka ........ जिल्हा Dist ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Addresss ........

माहिती असलेल्या आरोपींचे संपूर्ण नाव पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I-B वर वेगळ्या सिटवर पेउन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलचा जोडावे.)

Details Name & Address of Known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form I-B of attach FIR I-B to case diary)

लोकसेवक, नाव रोशन कदम, सहायक, जिल्हा परिषद कार्यालय. निफाड, नाशिक.

मा मु औ (क) २०३-(५,००५पुस्त)-१२२०५०

तेन करून माझे आईवडील निराग दिला गा ... मांग" असे सांगितले होते. त्याप्रमाणे ...

(68)

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........
Reasons for delay in reporting by the complainant/informant निरंक

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालपत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकुर पाठीमागे लिहावे
Particulars of properties stolen and involved ( Attach necessary Proform) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालपत्तेचे एकूण मुल्य —
Total value of properties stolen/involved
(b) चोरीची मिळालेली मालपत्ता (Recover properties) ........

11. अकस्मात मृत्यु / अपघाती मृत्यु असल्यास त्याचा क्रमांक —
Unnatural/ Accident Death. Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
F.I.R. Information brief Content (Attach separate sheets, if required) : Detail Write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील कॉलम नं. 07 मधील आलोसे इसम लोकसेवक श्री गणेश ढवळे सहायक निबंधक कार्यालय निफाड यांनी फिर्यादी नामे नरेंद्र (रोकडे) ताजणे यांचा तक्रारी अर्जाचा अहवाल त्यांचे बाजूने वरिष्ठ कार्यालयात सादर करण्याचे मोबदल्यात फिर्यादी यांचे अ 2,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्वीकारण्याची तयारी दर्शविली अ लाच स्विकारण्याचा प्रयत्न केला आहे. यावरुन लोकसेवक श्री गणेश ढवळे यांनी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाने स्वतासाठी पैश्याच्या स्वरुपात लाभ मि[illegible] करुन गुन्हा [illegible] [illegible] ला. प्र. अधि. 1988 चे कलम 7, 7 (अ) अन्वये गुन्हा नोंद क्र. [illegible] अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पोलिस उपअधिक्षक अनिल बडगुजर

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासाकामी तपास, करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नांव व हुद्दा ........
2. तपास नाकारण्यात आला. त्याचे कारण. ........
3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ला. प्र. वि. जिल्हा नाशिक ........ राज्य ........
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I. O.) ........ Rank ........ No ........
to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S. ........
District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने/फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली. (signature)
F.I.R read over to the Complaint / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complaint/ informant, free of cost
(R.O.A.C.)

(signature)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही (signature)
Signature of Officer Incharge, Police Station
संपूर्ण नाव Name ........ [illegible] गायकवाड
पदनाम Rank ........
तपासिक अं. चा कोड क्र. पो. ना. - 1784
Posting. मुंबई नाका पो. स्टेशन
Code No. of I. O. ........ नाशिक शहर

15. १. न्यायालयात सरदर केल्याची तारीख ........
1. Date and Time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधिक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complaint, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy

Attachment to item 7 of First Information Report (के) -Form- 1- A

CamScanner
Scanned with OKEN Scanner

फिर्याद

मुंबईनाका पोलीस ठाणे, नाशिक
दिनांक ०९/११/२०२३

माझे नाव नरेंद्र (राजेंद्र) भास्कर ताजणे वय ५३ वर्षे, व्यवसाय शेती व बांधकाम रा. बंगला नं. ४४, विजयनगर कॉलनी, औरंगाबादा नाका, पंचवटी नाशिक ३, मो. नं. ९४२२७६२८६५, ९०१११०२९९९ समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो कि, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहत मी शेती तसेच बांधकाम व्यवसाय करतो. मला व्यवसायात आलेल्या आर्थिक अडचणींमुळे मी सन २०२० मध्ये रविंद्र घुगे व केशव सांगळे यांचेकडुन हात उसनवार म्हणुन बिनव्याजी ४० लाख रू घेतले होते. सदर पैशांची सिक्युरिटी म्हणुन मी व पत्नी सौ दिपाली ताजणे आमचे नावावर असलेली मौजे जानोरी ता. दिंडोरी जि. नाशिक येथील शेतजमीन क्षेत्र ३९ गुंठे ही त्यांना तारण म्हणुन दिली होती. नंतर वरील इसमांचे पैसे परत करण्यासाठी श्री अर्जुन गणपत राउत यांचे मध्यस्थीने श्री घनश्याम बाळकिसन सोनी रा. पिंपळगाव बसवंत ता. निफाड जि. नाशिक यांचेकडुन ४५ लाख रू व्याजाने घेतले त्या बदल्यात मी त्यांचे सांगणेवरून श्री रतन मधुकर गायकवाड रा. पिंपळगाव बसवंत यांना जानोरी येथील श्री घुगे व सांगळे यांना तारण दिलेली जमिन श्री घुगे व सांगळे यांचेकडुन स्टॅम्प डयुटी वाचविणेकरीता परस्पर खरेदी दिली. सदर व्यवहारापोटी मी काही महीने घेतलेल्या पैशांचे व्याजही दिले. दरम्यान मी त्यांना मुद्दलपैकी १५ लाख रू परत देत होतो ते घेण्यास त्यांनी नकार दिला व माझेशी वाद घालण्यास सुरवात केली. तसेच त्यांनी माझी संमती नसतांना वरील जमिन विक्री करणेकामी परस्पर दैनिक देशदुत या वृत्तपत्रात जाहिर नोटीस दिली. त्यास आम्ही रितसर हरकत घेतली. सदर बाबत मी मा. पंतप्रधान सो, मा. गृहमंत्री सो भारत सरकार, मा. अध्यक्षा राज्य महीला आयोग, महाराष्ट्र, मा. पोलीस अधिक्षक सो, मा. विभागीय आयुक्त व जिल्हा निबंधक सो यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केले. मा. मुख्यमंत्री सो महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे दिलेला तक्रारी अर्ज अधिक चौकशीकामी मा. सावकारांचे निबंधक, सहायक निबंधक, सहकारी संस्था, निफाड येथील श्री कांतीलाल गायकवाड सो, यांचेकडे गेला. त्या अनुषंगाने श्री कांतीलाल गायकवाड सो, सहायक निबंधक निफाड यांनी मला दि. २०/०७/२०२३ रोजी चौकशीसाठी बोलाविले होते. तेव्हा मी त्यांना श्री घनश्याम सोनी, श्री अर्जुन गणपत राउत व माझे दरम्यान मोबाईलवर झालेल्या संभाषणाच्या, कॉल रेकॉर्डिंगच्या सिडी, टेक्स मेसेजेसचे झेरॉक्स, व्हॉटस अप मेसेजेच्या झेरॉक्स, पेनड्राईव्ह असे सर्व पुरावे दि. १४/०८/२०२३ रोजी दिले. सदर अहवाल वरिष्ठांना पाठवितांना माझे बाजुने पाठविण्यासाठी सहायक निबंधक, सहकारी संस्था, निफाड कार्यालयातील श्री कांतीलाल गायकवाड व तेथील कर्मचारी श्री. राजेश ढवळे यांनी माझेकडे दिड लाख रू लाचेची मागणी केली होती. मला त्यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी सदर बाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक यांचेकडे सविस्तरपणे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने पोलीस उपअधीक्षक श्री अनिल बडगुजर साहेबांनी दि. ०५/०९/२०२३ रोजी सहायक निबंधक कार्यालय निफाड येथील कर्मचारी श्री राजेश ढवळे हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणे कामी मला व पंच श्री धनंजय वाटाणे अशांना पाठविले होते. नमुद दिवशी लोकसेवक श्री ढवळे यांनी माझेकडे पैशांची मागणी केली नाही मात्र माझे काम करून देण्याचे सुचित केले होते. त्यामुळे सदर कार्यवाही तात्पुरती स्थगित करण्यात आली होती.

त्यानंतर दिनांक ०५/०९/२०२३ रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान उशिरा माझा फोन बंद झाल्याने श्री ढवळे यांनी त्यांचा मोबाईल नंबर ८८३०३२७२६९ या नंबर वरून माझे घरातील मोबाईल नंबर ८३८००९९३५० यावर फोन करून माझे आईकडे निरोप दिला की, "१ किलो ढोकळा पाहीजे असुन, माझेशी बोलायचे आहे, करीता घरी आल्यावर फोन करावयास सांगा" असे कळविले होते. त्याप्रमाणे मी घरी आल्यावर माझा मोबाईल नंबर ९४२२७६२८६५ यावरून लोकसेवक श्री ढवळे यांना फोन केला असता त्यांनी मला दिनांक ०६/०९/२०२३ रोजी सकाळी ०९:०० वाजता मुंबई नाका येथे १ किलो खमंग ढोकळा घेवुन चर्चा करण्यासाठी या असे सांगितले. मी लागलीच सदर बाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक यांना माहीती देवुन दिनांक ०६/०९/२०२३ रोजी श्री ढवळे यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी वगैरे मजकुराची पुरवणी तक्रार दिली आहे.

मी दिलेल्या नमुद तक्रारीचे अनुषंगाने पोलीस उप अधिक्षक श्री बडगुजर लाप्रवि नाशिक यांनी दि. ०५/०९/२०२३ रोजी बोलाविलेल्या दोन्ही शासकीय पंचांना कार्यालयात बोलावुन घेवुन त्यांना माझे पुरवणी तक्रारी बाबत सांगुन लोकसेवक श्री राजेश ढवळे हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणे कामी पंचांसह पाठविण्याचे ठरविले. त्यानंतर मी, पंच तसेच व पोलीस उपअधिक्षक श्री बडगुजर साहेब सापळा पथकासह इंदीरानगर बोगदयाजवळील पॅनॅशिया हॉस्पीटल जवळ आलो. सदर वेळी दि. ०५/०९/२०२३ माझे सोबत पंच नं. १ म्हणुन पाठविलेले श्री वाटाणे यांचेऐवजी दुसरे शासकीय पंच श्री निलेश जाधव यांना पंच नं. १ म्हणुन पाठविले. मुंबईनाका येथे मी श्री ढवळे यांना फोन केला ते मुंबईनाका येथे आले. त्यावेळी त्यांनी माझे तक्रारी अर्जाचा चौकशी अहवाल माझे बाजुने तयार केला असुन

CS CamScanner

Scanned with OKEN Scanner

त्याचा अहवाल त्यांनी मोबाईल मधुन मला वाचुन दाखविला तसेच सदर अहवालावर त्यांचे साहेबांची सही देखील झाली असल्याचे मला मोबाईल मध्ये दाखविले. तसेच सदर काम करून दिले म्हणुन १ लाख रू लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य करून सदर रक्कम निफाड येथील उगाव रोडवरील सोनी पतसंस्थेत जावुन गुरू नावच्या व्यक्तीकडे देण्यास सांगितले असुन तसा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर दि. ०६/०९/२०२३ रोजी पोलीस उप अधिक्षक श्री बडगुजर साहेब, सापळा पथक आणि दोन्ही पंच असे निफाड येथे एकत्र आलो. सदर ठिकाणी माझेकडील बचतीमधील ५००/- रू. दराच्या ५० नकली नोटा मिळुन एकुण २५,०००/- रू. व ५००/- रू. दराच्या एकुण १५० डमी नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावुन सदर नोटा व व्हाईस रेकॉर्डरसह मला पंच श्री जाधव यांचेसह सोनी पतसंस्था उगाव रोड निफाड येथे माझे मोटारने रवाना केले. त्यावेळी मी लोकसेवक श्री ढवळे यांना फोन केला असता त्यांनी ५ मिनिटात येतो असे सांगुन बराच वेळ न आल्याने मी त्यांना पुन्हा फोन केला असता त्यांनी मला सहकार निबंधक कार्यालयाचे समोरील श्री स्वामी समर्थ मंदीरात येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी पंचासह स्वामी समर्थ मंदीराजवळ गेलो. सदर ठिकाणी बराच वेळ वाट पाहुनही लोकसेवक श्री ढवळे यांनी माझेशी संपर्क केला नाही. नंतर त्यांना फोन केले असता माझे फोनही उचलेले नाही. त्यामुळे सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करून नाशिक येथे निघुन आलो. तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

दिनांक ०७/०९/२०२३ रोजीही श्री बडगुजर साहेब यांनी माझे राहते घरी सापळा कारवाई आयोजित केली असता मी लोकसेवक श्री. राजेश ढवळे यांना फोन केला असता त्यांनी आज नाशिक मध्ये काम आहे, दुपारी निफाडला जाणार तेव्हा गाडी लावेल, तेव्हा फोन करतो, निफाड वरून येतांना फोन करतो'' वगैरे सांगितले परंतु त्यांनी नंतर फोन केला नाही तसेच मी केलेले कॉलही रिसिव्ह केले नाहीत. त्यामुळे सदर दिवशीही सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करून तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दरम्यान लोकसेवक श्री ढवळे यांनी मला फोन करून दि. १८/१०/२०२३ रोजी भेटतो बाबत सांगितल्याने सदर बाब मी लाप्रवि कार्यालय नाशिक येथे श्री बडगुजर साहेब यांना कळविले. त्यावरून त्यांनी दि. १८/१०/२०२३ रोजी निफाड येथे सापळा कार्यवाही आयोजित केली असता लोकसेवक श्री ढवळे यांनी त्यांचे कार्यालयात मला ''१५ मिनीटांनी येतो, तुमचे पेपर दाखवितो, तुमचीपण खात्री होउन जाईल मग बोलु'' असे बोलुन लोकसेवक श्री ढवळे हे त्यांचे कार्यालयातुन बाहेर निघुन गेले. माझे सोबत असलेल्या पंच साक्षीदारांना संशय आला असावा म्हणुन लोकसेवक श्री ढवळे हे पुन्हा त्यांचे कार्यालयात परत न आल्याने नंतर मी त्यांना केलेले फोन कॉलही रिसीव्ह न केल्याने सदर सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर दिनांक २६/१०/२०२३ रोजी मी लोकसेवक श्री. ढवळे यांचे कार्यालयात माझे अर्ज चौकशी बाबत विचारपुस करण्यासाठी व अधिक माहीती घेण्यासाठी गेलो असता सदर ठिकाणी गेल्यावर कार्यालयातील कर्मचारी श्री. भदाणे यांचेकडुन समजले की लोकसेवक श्री. ढवळे हे रजेवर असल्याचे सांगुन त्यांनी माझे तक्रारी अर्जाबाबतचा अहवाल व इतर कागदपत्रे सोमवारी नाशिक कार्यालयात पाठविले असल्याचे समजले यावरून ते आता माझेकडे मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारतील असे मला वाटत नाही. .

लोकसेवक श्री ढवळे यांनी माझे तक्रारी अर्जाचा चौकशी अहवाल माझे बाजुने वरीष्ठ कार्यालयात सादर करण्यासाठी माझेकडे १ लाख रू लाचेची मागणी केली परंतु लोकसेवक श्री राजेश ढवळे यांनी माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारली नाही. तसेच त्यांनी माझे अर्जाचा चौकशी अहवाल नाशिक कार्यालयात पाठवुन दिला आहे. त्यामुळे लोकसेवक श्री राजेश ढवळे हे माझेकडे मागणी केलेली लाचेची रक्कम माझ्याकडुन भविष्यात स्विकारणार नाहीत असे मला वाटते करीता त्यांचेविरूध्द कायदेशीर कार्यवाही करा बाबत मी सांगितल्याने तसा माझा दि. ०६/११/२०२३ रोजी सविस्तर जबाब नोंदिवण्यात आला आहे.

तरी लोकसेवक श्री. राजेश ढवळे, सहायक निंबधक यांचे कार्यालय, निफाड यांनी दिनांक ०६/०९/२०२३ रोजी सकाळी ०८:४८ ते ०९:५० वाजेच्या दरम्यान मुंबई नाका सर्कल, नाशिक येथे माझे तक्रारी अर्जाचा चौकशी अहवाल माझे बाजुने वरिष्ठ कार्यालयात सादर करण्याचे मोबदल्यात माझेकडे १,००,०००/- रू लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली असुन लाच स्विकारण्याचा प्रयत्न केला आहे. यावरून लोकसेवक श्री राजेश ढवळे यांनी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वत:साठी पैशांच्या स्वरुपात लाभ मिळविण्याची व्यवस्था करून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केल्याने त्यांचेविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असुन ती मी वाचुन पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

समक्ष

(सही)

ठाणे अंमलदार
मुंबई नाका पोलीस स्टेशन.
नाशिक शहर.

ही फिर्याद दिली
दि. ०६/११/२०२३

(सही)

नरेंद्र (राजेंद्र) भास्कर ताजणे

CamScanner
Scanned with OKEN Scanner